महाराष्ट्र शासन

# शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय

## औरंगाबाद



# वार्षिक अहवाल

## 2022-2023

महाराष्ट्र शासन

# शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद

## वार्षिक अहवाल

2022-2023

दि. २२/०७/२०२३ रोजी, महाविद्यालयामध्ये उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे

मा. प्रधान सचिव श्री. विकासचंद्र रस्तोगी यांनी भेट दिली.







**प्र.अधिष्ठातांचे मनोगत**

जगविख्यात अजिंठा व वेरूळ या सांस्कृतिक लेण्यांनी नटलेल्या, संत एकनाथ, स्वामी रामानंद तीर्थ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर अशा महान विभूतींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीवर मराठवाड्याच्या संस्कृती व कलेचा वेध घेण्याचा या महाविद्यालयाचा एक अल्पसा प्रयत्न ठरेल. कलेला समाजाभिमुख करण्याचे कार्य या कला महाविद्यालयाने सातत्याने केलेले आहे. १३ ऑगस्ट, १९७१ साली औरंगाबाद येथे मराठवाड्यात सुरू झालेली पहिली कला संस्था, शासकीय कला महाविद्यालय [गव्हर्नमेंट स्कूल ऑफ आर्ट औरंगाबाद.] या महाविद्यालयाचे पहिले तत्कालीन अधिष्ठाता प्रा.गो. कृ. देशपांडे व त्यानंतर संस्थेची धुरा अनेक अधिष्ठाता यांनी यशस्वीपणे सांभाळली व सध्याचे विद्यमान अधिष्ठाता प्रा.रमेश वडजे कार्यभार सांभाळत आहेत. ते वैद्यकीय कारणास्तव रजेवर गेल्यामुळे दिनांक २१ जून २०२३ पासून मा. कला संचालक साहेबांचे आदेशाने मी अधिष्ठाता पदाचा कार्यभार सांभाळत असून, माझ्या कार्यकाळात वार्षिक अहवाल प्रकाशित झाल्यामुळे आम्हा सर्वांना मनस्वी आनंद झाला आहे.

माननीय श्री. विकासचंद्र रस्तोगी, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांनी शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद येथे दिनांक २२ जुलै, २०२३ रोजी भेट दिली. त्यावेळी त्यांनी आपल्या महाविद्यालयाचा सन २०२२-२३ 'वार्षिक अहवाल मा. पालकमंत्री श्री संदीपानजी भुमरे यांच्या शुभहस्ते स्वातंत्र्यदिनी प्रकाशित करण्यात यावा असे सुचवले. माझ्या माहितीप्रमाणे महाविद्यालयाच्या इतिहासामध्ये १५ ऑगस्ट रोजी प्रकाशित होणारा हा पहिलाच अंक आहे आणि याचे सर्व श्रेय मा. प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी साहेब यांना जाते. तसेच मा. कला संचालक साहेब यांच्या मार्गदर्शनाने महाविद्यालय यशस्वीपणे वाटचाल करीत आहे.

या संस्थेतील विद्यार्थ्यांची आपली स्वतःची अशी ओळख आहे. माझ्या प्रदीर्घ सेवाकाळात असं लक्षात येतं की विविध कला शाखेचे पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी खूप मोठ्या संख्येने राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर पुरस्कार प्राप्त केले आहेत व विविध ठिकाणी शासकीय सेवेत व खाजगी कंपन्यांमध्ये उच्च पदावर कार्य करीत आहेत, तसेच अनेक विद्यार्थी आपला स्वतंत्र व्यवसाय यशस्वीपणे करीत आहेत.

विजय मधुकर सुरळकर
प्र.अधिष्ठाता
शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद

## अधिष्ठातांचे मनोगत

चित्र ही जगातली समृद्ध भाषा. या भाषेचं व्याकरण शिकण्यासाठी, ती अधिक समृद्ध आणि सौंदर्यपूर्ण करण्यासाठी हजारो उपासक, साधक या कला मंदिरात येत राहिले आणि येत आहेत. या अविरत चालणा-या उपासनेला, साधनेला पन्नास- एक वर्ष झालीत. शासकिय कला व अभिकल्प महाविद्यालय हे त्या कला मंदिराचं नाव !

चित्र हे अभिव्यक्तीचं सशक्त माध्यम, -हे माध्यम समर्थपणे हाताळत अनेक यशस्वी कलावंत व्यक्त होत गेले. जगमान्य झाले. हया काली मंदिराची परंपरा जपत राहिले. वेरुळ-अजिंठा आणि पितळखो-याच्या सान्निध्यात असलेलं हे कलामंदिर! अर्थात शासकीय कला संस्था. प्राचीन कलेचा वारसा जपत अधुनिक युगातील बदला प्रमाणे इथल्या कलावतांनी आपल्या अभिव्यक्तित बदल केले. काळानुरूप जगाला हवं ते दिलं. अर्थातच या बदलासाठी या संस्थेतील अध्यापकांचे आणि कर्मचाऱ्यांचेही योगदान तितकेच मोठे आहे. विद्यार्थी घडविण्यासाठी समर्पित वृत्तीनं त्यांनी झोकून देऊन ज्ञानार्जन केलं. परिश्रम घेतले. स्पर्धेची चाकं लावून कार वेगानं पुढे जातेय नवं नवं तंत्रज्ञान आणि आव्हाने समोर उभी आहेत. अशा परिस्थितीत त्या संस्थेतील विद्यार्थी कुठेही कमी पडणार नाही याची दक्षता शासन स्तरावरून घेतली आहे. कला विषयाचा संबंध वैद्यकीय ,अभियांत्रिकी, विज्ञान, कृषी यासारख्या शाखांशी जोडून इथला विद्यार्थी अधिक सक्षम करण्याच्या योजना शासन स्तरावरून यशस्वीपणे राबविल्या जात आहेत त्या कामी विभागाचे प्रधान सचिव मा. रस्तोगी साहेबांचे योगदान मोठं आहे.

विद्यार्थ्यांची निर्मिती समाजाभिमुख व्हावी व राष्ट्रउभारणीत त्यांचे योगदान असावे यासाठी संस्था सतत प्रयत्नशील आहे. व्यापार, शेती, आरोग्य, पर्यावरण, राष्ट्रहित, संस्कृती व नीतीमूल्य यावर आधारित विषय हाताळताना विद्यार्थी दिसत आहेत. केवळ कलाशिक्षण देणे हा या संस्थेचा हेतू नसून आत्मनिर्भर आदर्श नागरिक देशाला दयायचे आहेत हा निश्चय आहे.

संस्थेत रेखा व रंगकला , उपयोजित कला, वस्त्रकला आणि कलाशिक्षक प्रशिक्षण असे विभाग आहेत. हया सर्व विभागात शासनाच्या वतीने आवश्यक त्या सर्व पायाभूत सुविधा आणि आधुनिक तंत्रज्ञानानुसार आवश्यक ती सर्व साधन सामग्री उपलब्ध करून दिली आहे. समाज उपयोगी कला निर्मिती करीत असतांना विद्यार्थ्यांना निर्मितीचा आनंद घेता यावा व कलेद्वारा जीवनच आनंदी व सौंदर्यपूर्ण बनविण्यासाठी तसेच कलेचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी ही संस्था ' वचनबद्ध आहे.

जय हिंद, जय महाराष्ट्र!

प्रा. रमेश सुभाष वडजे
अधिष्ठाता
शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद

# संपादकीय

५२ वर्षापूर्वी तत्कालीन महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री कै.वसंतराव नाईक यांच्या शुभ हस्ते दिनांक १३ ऑगस्ट, १९७१ ललित कला शिक्षण देणाऱ्या मराठवाड्यात या एकमेव महाविद्यालयाचे उद्घाटन झाले. त्याच वर्षी या क्षेत्रातील पायाभूत अभ्यासक्रम व कला शिक्षक प्रशिक्षण हे अभ्यासक्रम सुरु झाले. १९७२ साली पायाभूत अभ्यासक्रमा नंतरचे उच्च शिक्षणाचे उपयोजित कला व रेखा व रंगकला हे पदविका अभ्यासक्रम सुरु झाले. त्यानंतर अल्पमुदत छायाचित्रण व स्क्रिन प्रिंटिंग हे अंशकालिक अभ्यासक्रम सुरु करण्यात आले. १९८१ -८२ या शैक्षणिक वर्षात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी महाविद्यालयाने संलग्नता प्राप्त करुन उपयोजित कला तसेच रेखा व रंगकला हे पदवी अभ्यासक्रम प्रथमतःच मराठवाड्यात सुरु करण्यात आले तसेच, १९८२ पासून सेवांतर्गत ए.टी.डी. असणाऱ्या चित्रकला शिक्षकांसाठी सुट्टीच्या कालावधीतील आर्ट मास्टर (ए.एम.) हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षापासून बी.एफ. ए. वस्त्रकला व एम. एफ. ए.उपयोजित कला व रेखा व रंगकला हे पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यात आले.

शैक्षणिक वर्षांत अभ्यासक्रम राबवित असतांनाच इतरही अनेक शासकीय व शैक्षणिक उपक्रम महाविद्यालयामध्ये साजरे करण्यात आले आहेत. वर्षभरात शासनाने वेळोवेळी निर्देशित केलेले कार्यक्रम महाविद्यालयाने पार पाडले आहेत.

या महाविद्यालयात २८१ विद्यार्थी उच्च कलेचे शिक्षण घेत आहेत. महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी देशात व परदेशात अनेक मोठ्या पदावर कार्यरत आहेत, सरकारी क्षेत्रात व स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय सांभाळत आहेत, उच्च शिक्षणासाठी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी इतर राज्यात, एन. आय. डी. व आय. आय. टी. इत्यादी. क्षेत्रात उच्च शिक्षण घेत आहेत हे महाविद्यालयाच्या दृष्टिने अभिमानाची बाब आहे. आपल्या महाविद्यालयात उच्च शिक्षित अध्यापक वर्ग कार्यरत आहे. हा वार्षिक अहवाल आपल्या हाती देताना एक समाधानाची भावना मनात आहे. या संपूर्ण वर्षातील माहितीचा दस्तावेज आपल्याकडे सुपूर्द करण्यात येत आहे.

महाविद्यालयातील विविध विभाग हे या माहितीचे मूळ स्त्रोत आहेत. ही सर्व प्राप्त माहिती संकलित आणि संपादित करून हा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. आम्ही सादर करीत

असलेला हा अहवाल परिपूर्ण आहे असा दावा आम्ही करीत नाही. तरीही अहवाल परिपूर्ण करण्याचा आम्ही एक प्रयत्न केलेला आहे.

सामाजिक बांधिलकी व गुणवत्ता हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून महाविद्यालय कार्यरत आहे. वेगवेगळ्या पातळ्यांवर विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून, विविध शैक्षणिक व अभ्यासक्रमेतर उपक्रमही राबविले जात आहेत. संशोधन, अध्ययन या संबंधी सजग राहून शिक्षणाचा दर्जा वाढविण्याचे प्रयत्न होत आहेत. विस्तार आणि विकासाची ही पायवाट या अहवालात स्थूलपणे न्याहाळता येईल असा विश्वासही आम्हाला वाटतो.

अहवाल सिद्धतेसाठी महाविद्यालयातील विविध विभागांची आम्हाला अमूल्य मदत झाली. मा.अधिष्ठाता, प्रबंधक, आस्थापना, लेखा विभाग, विद्यार्थी विभाग, सर्व विभागातील अध्यापक, व अहवाल मुखपृष्ठ-श्री.विशाल घुगे व छपाई आणि मुद्रण करिता श्री. अश्विन जोगदंड यांचे सहकार्य लाभले. याशिवाय अनेकांचे हात या अहवाल प्रसिध्दीसाठी लागलेले आहेत. त्या सर्वांबद्दलची कृतज्ञता व्यक्त करते.

शायनी श. देठे
प्र.रंगरेखा अधिकारी
शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय ,औरंगाबाद.

------------------

# शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय, क्र.एडीआर-११०१/(८८/०१)/तांशि-७,
दि.३०/१२/२००६ च्या आढाव्या नुसार संस्थेत मंजूर, रिक्त, भरलेली पदांची माहिती दर्शविणारा तक्ता :-

| अ.क्र. | नाववपदनाम | शैक्ष. अर्हता | मंजूर पदसंख्या | भरलेली पदे | | रिक्त |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नियमीत | कंत्राटी | |
| १ | प्रा.रमेश सु.वडजे, अधिष्ठाता | जी.डी.आर्ट (स्कल्पचर), डिप.ए.एड | १ | १ | -- | -- |
| २ | रिक्त : प्राध्यापक | -- | २ | -- | -- | २ |
| ३ | रिक्त : प्राध्यापक | -- | | | | |
| ४ | श्री. राजेंद्र वि.गिरी अधिव्याख्याता | बी.एफ.ए., एम.एफ.ए. उपयोजित कला | | | | |
| ५ | श्री.विजय म. सुरळकर, अधिव्याख्याता | बी.एफ.ए. उपयोजित कला | २३ | ४ | ४ | १५ |
| ६ | श्रीमती.शायनी श. देठे, अधिव्याख्याता | बी.एफ.ए. वस्त्रकला | | | | |
| ७ | श्री.तुषार बा.चिखले, अधिव्याख्याता | बी.एफ.ए. वस्त्रकला | | | | |
| ८ | श्री.प्रदिप जा.कुमावत, अधिव्याख्याता (कंत्राटी) | एम.एफ.ए. रेखा व रंगकला, डिप.ए.एड, ए.टी.डी. | | | | |
| ९ | श्री.नारायण पुं. सोनवणे अधिव्याख्याता (कंत्राटी) | एम.एफ.ए. रेखा व रंगकला, डिप.ए.एड, ए.टी.डी. | | | | |
| १० | श्रीम.अश्विनी र.सालोडकर अधिव्याख्याता (कंत्राटी) | एम.एफ.ए. उपयोजित कला | | | | |
| ११ | डॉ.अंबादास ना.जाधव अधिव्याख्याता (कंत्राटी) | पी.एचडी ,एम.एफ.ए. रेखा व रंगकला | | | | |
| १२ | रिक्त अधिव्याख्याता | -- | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | रिक्त<br>अधिव्याख्याता | -- | | | | |
| १४ | रिक्त<br>अधिव्याख्याता | -- | | | | |
| १५ | रिक्त<br>अधिव्याख्याता | -- | | | | |
| १६ | रिक्त<br>अधिव्याख्याता | -- | | | | |
| १७ | रिक्त<br>अधिव्याख्याता | -- | | | | |
| १८ | रिक्त<br>अधिव्याख्याता | -- | | | | |
| १९ | रिक्त<br>अधिव्याख्याता | -- | | | | |
| २० | रिक्त<br>अधिव्याख्याता | -- | | | | |
| २१ | रिक्त<br>अधिव्याख्याता | -- | | | | |
| २२ | रिक्त<br>अधिव्याख्याता | -- | | | | |
| २३ | रिक्त<br>अधिव्याख्याता | -- | | | | |
| २४ | रिक्त<br>अधिव्याख्याता | -- | | | | |
| २५ | रिक्त<br>अधिव्याख्याता | -- | | | | |
| २६ | रिक्त<br>अधिव्याख्याता | -- | | | | |
| २७ | श्री.विनोद रं.दांडगे,<br>प्रबंधक | बी.ए. | १ | १ | -- | -- |
| २८ | रिक्त<br>ग्रंथपाल | -- | १ | -- | -- | १ |
| २९ | श्री.भाऊसाहेब व.<br>पाटील, प्रमुख लिपीक | बी.ए. | १ | -- | -- | १ |
| ३० | श्री.कल्याण ए.गावंडे,<br>वरीष्ठ लिपीक | एच.एस.सी | १ | १ | -- | -- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३१ | श्री.नामदेव अ. वराडे, लघुलेखक निम्नश्रेणी | बी.ए.,लघुलेखन १०० श.प्र.मि. | १ | १ | -- | -- |
| ३२ | रिक्त :टिप्पणी सहायक-संगणक ऑप. | -- | १ | - | -- | १ |
| ३३ | श्री.पवनसिंग बा. महेर, लिपीक टंकलेखक | बी.ए. | १ | १ | -- | -- |
| ३४ | रिक्त : यंत्रपरिचर | -- | १ | -- | -- | १ |
| ३५ | रिक्त: नाईक | -- | १ | -- | -- | १ |
| ३६ | रिक्त : ग्रंथालय परिचर | -- | १ | -- | -- | १ |
| ३७ | श्री.लक्ष्मण ध.वानखेडे, शिपाई | एस.एस.सी. नापास | ४ | ३ | -- | १ |
| ३८ | श्री.आ.ह.सय्यद, शिपाई | एस.एस.सी. नापास | | | | |
| ३९ | रिक्त : शिपाई | -- | | | | |
| ४० | रिक्त : शिपाई | -- | | | | |
| ४१ | श्री.सुर्यकांत उ.सोनवणे, हमाल | एस.एस.सी. नापास | ३ | २ | -- | १ |
| ४२ | श्री.पुनमचंद मो.खरे, हमाल | एस.एस.सी. नापास | | | | |
| ४३ | श्रीम.सपना सं. सलामपुरे हमाल | एस.एस.सी. नापास | | | | |
| ४४ | श्री.ज्ञानेश्वर सुं.कुऱ्हे, माळी | बी.ए. | १ | १ | -- | -- |
| ४५ | रिक्त : चौकीदार | -- | २ | -- | -- | २ |
| ४६ | रिक्त : चौकीदार | -- | | | | |
| ४७ | रिक्त : सफाईगार | -- | १ | -- | -- | १ |
| | | **एकूण** | **४७** | **१५** | **४** | **२८** |

*श्री.भाऊसाहेब व. पाटील, प्रमुख लिपीक हे शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय,नागपूर या ठिकाणावरून विनंती बदली होऊन १६ जानेवारी २०२३ रोजी रुजू झाले.

*श्री.राजेंद्र गिरी यांची विनंती बदली नागपूर येथील शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय येथे दिनांक ३१ मार्च,२०२३ रोजी झाली.

*सेवानिवृत्त शिक्षकेतर कर्मचारी -श्री.अशोक मा.मुळे (शिपाई)
*दिवंगत शिक्षकेतर कर्मचारी - कै.संतोष रा.सलामपुरे (हमाल)
*दिवंगत सं.रा.सलामपुरे यांच्या पत्नी श्रीम.स.सं.सलामपुरे यांना अनुकंपा तत्वावर दि.२०/२/२०२३ रोजी सेवेत सामावून घेण्यात आले.

शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.एडीआर-२०१९/प्र.क्र.१४/तांशि-६ दिनांक ८ जुलै २०२० नुसार कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय कला महाविद्यालयांमधील अध्यापकीय पदांचा आकृतीबंध सुधारीत करण्यात आलेला आहे, त्यानुसार अध्यापकीय पदांची संख्या २५ (२३+२) वरुन ३४ एवढी वाढ करण्यात आलेली आहे. सदर पदांची पदभरती आज तारखेपर्यंत झालेली नाही.

# शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद
## आर्थिक अहवाल २०२२-२३

| अ.क्र. | योजनेचे नाव व लेखाशीर्ष | प्रत्यक्ष खर्च / अंतिम सुधारित अनुदान |
|---|---|---|
| १ | (०१) वेतन | २४६५७२६३ |
| २ | (०६) दूरध्वनी,विज व पाणी शुल्क | ३४४३४९ |
| ३ | (१०) कंत्राटी सेवा | ११५२००० |
| ४ | (११) देशांतर्गत प्रवास खर्च | ११२४४७ |
| ५ | (१३) कार्यालयीन खर्च | ८२२३०० |
| ६ | (१४) भाडेपट्टीव कर | ६८२७७० |
| ७ | (१६) प्रकाशने | ३६००० |
| ८ | (१७) संगणक खर्च | ६६६०३ |
| ९ | (२१) पुरवठा व सामुग्री | ४००००० |
| १० | (२६) जाहिरात व प्रसिद्धी | ० |
| ११ | (२७) लहान बांधकामे | ० |
| १२ | (२८) व्यावसायिक सेवा | २८४४०२४ |
| १३ | (३४) शिष्यवृत्ती /विद्यावेतने | ० |
| १४ | (५०) इतर खर्च | ३२४७३ |
| १५ | (५३) यंत्रसामुग्री व साधनसामुग्री | ० |

# विद्याशाखेतील विद्यार्थी संख्या दर्शविणारा तक्ता

## शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद ४३१००१

शासकीय कला संस्थाकडून वेगवेगळया अभ्यासक्रमांसाठी असलेल्या जागी प्रवेश मिळावा म्हणून आलेल्या अर्जांची संख्या व वर्गवार देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या इत्यादी माहिती दर्शविणारा तक्ता.

| वर्ष | अभ्यासक्रमांचे नाव | प्रवेश मर्यादा | राखीव जागांचे प्रमाण | | | | | | आलेल्या अर्जांची वर्गवार विभागणी | | | | | | | प्रवेश देवण्यात आलेली वर्गवारी विभागणी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | वि.जा.भ.ज. | वि.मा.प्र. | इ.मा.व | इतर | प्रवेशासाठी आलेले अर्ज | अ.जा. | अ.ज. | वि.जा.भ.ज. | वि.मा.प्र. | इ.मा.व | इतर | प्रवेश देण्यात आलेल्यांची संख्या | अ.जा. | अ.ज. | वि.जा.भ.ज. | इ.मा.व | वि.मा.प्र. | इतर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ |
| २०२१-२२ | बी.एफ.ए. रेखा व रंगकला (पदवी) | ६० | ८ | ४ | ६ | १२ | २ | २८ | ३७ | ३ | ३ | ० | १० | ० | २१ | ३७ | ३ | ३ | ० | १० | ० | २१ (SEBC-१) |
| | बी.एफ.ए. उपयोजित कला (पदवी) | १४० | १८ | १० | १५ | २७ | ३ | ६७ | ८७ | १४ | ३ | ७ | ३० | १ | ३२ | ८७ | १४ | ३ | ७ | ३० | १ | ३२(SEBC-१, EWS-२) |
| | बी.एफ.ए. वस्त्रकला (पदवी) | ६० | ८ | ४ | ६ | १२ | २ | २८ | ४५ | ८ | १ | ३ | १७ | १ | १६ | ४५ | ८ | १ | ३ | १७ | ० | १६ |
| | कला शिक्षक पदविका | ५० | ७ | ४ | ५ | ९ | १ | २४ | ३७ | ६ | १ | १० | १० | ० | १० | ३७ | ६ | १ | १० | १० | ० | १० |
| | एम.एफ.ए. पेन्टीग भाग १ व २ पदव्युत्तर | २० | ३ | १ | २ | ४ | ० | १० | ३ | ० | ० | ० | ० | ० | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | एम.एफ.ए. उपयोजित कला भाग १ व २ | ३० | ४ | २ | ३ | ६ | १ | १४ | ४ | १ | ० | ० | १ | ० | २ | २ | १ | ० | ० | १ | ० | ० |
| २०२२-२३ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | बी.एफ.ए. रेखा व रंगकला (पदवी) | ६० | ८ | ४ | ६ | १२ | २ | २८ | ५८ | ८ | ३ | ० | ० | २३ | २० | ५८ | ८ | ३ | ० | ० | २३ | २० |
| | बी.एफ.ए. उपयोजित कला (पदवी) | १४० | १८ | १० | १५ | २७ | ३ | ६७ | १२७ | २० | ३ | ५ | १ | ४९ | ४९ | १२७ | २० | ३ | ५ | १ | ४९ | ४९ |
| | बी.एफ.ए. वस्त्रकला (पदवी) | ६० | ८ | ४ | ६ | १२ | २ | २८ | ६२ | १० | २ | २ | २ | २२ | २४ | ६२ | १० | २ | २ | २ | २२ | २४ |
| | कला शिक्षक पदविका | ५० | ७ | ४ | ५ | ९ | १ | २४ | ३५ | १२ | ३ | १ | ० | १० | ९ | ३५ | १२ | ३ | १ | ० | १० | ९ |
| | एम.एफ.ए. पेन्टीग भाग १ व २ पदव्युत्तर | २० | ३ | १ | २ | ४ | ० | १० | २ | १ | ० | ० | ० | १ | ० | २ | १ | ० | ० | ० | १ | ० |
| | एम.एफ.ए. उपयोजित कला भाग १ व २ | ३० | ४ | २ | ३ | ६ | १ | १४ | १२ | २ | ० | ० | १ | १ | ८ | १२ | २ | ० | ० | १ | १ | ८ |
| २०२३-२४ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | बी.एफ.ए. रेखा व रंगकला (पदवी) | ६० | ८ | ४ | ६ | १२ | २ | २८ | | | | | | | | | | | | | | |
| | बी.एफ.ए. उपयोजित कला (पदवी) | १४० | १८ | १० | १५ | २७ | ३ | ६७ | | | | | | | | | | | | | | |
| | बी.एफ.ए. वस्त्रकला (पदवी) | ६० | ८ | ४ | ६ | १२ | २ | २८ | | | | | | | | | | | | | | |
| | कला शिक्षक पदविका | ५० | ७ | ४ | ५ | ९ | १ | २४ | | | | | | | | | | | | | | |
| | एम.एफ.ए. पेन्टीग भाग १ व २ पदव्युत्तर | २० | ३ | १ | २ | ४ | ० | १० | | | | | | | | | | | | | | |
| | एम.एफ.ए. उपयोजित कला भाग १ व २ | ३० | ४ | २ | ३ | ६ | १ | १४ | | | | | | | | | | | | | | |
| | एकूण | ३६० | ४८ | २५ | ३७ | ७० | ९ | १७१ | | | | | | | | | | | | | | |

Dean,
Government College of Art and Design,
Aurangabad

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये विद्यापीठाद्वारे पार पडलेल्या परीक्षेचा विभागवार निकाल व त्याची टक्केवारी.

| अ.क्र. | विभाग | विद्यार्थी संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | रेखा व रंगकला द्वितीय सत्र | १५ | १००% |
| २. | रेखा व रंगकला द्वितीय वर्ष | ११ | ८१.८२% |
| ३. | रेखा व रंगकला तृतीय वर्ष | १६ | ८७.५०% |
| ४. | रेखा व रंगकला अंतिम वर्ष | २३ | ७३.९१% |
| ५. | रेखा व रंगकला एम.एफ.ए. द्वितीय वर्ष | ३ | १००% |
| ६. | वस्त्रकला द्वितीय सत्र | १४ | १००% |
| ७. | वस्त्रकला द्वितीय वर्ष | १४ | १००% |
| ८. | वस्त्रकला तृतीय वर्ष | १५ | १००% |
| ९. | वस्त्रकला अंतिम वर्ष | १५ | १००% |
| १०. | उपयोजित कला द्वितीय सत्र | २८ | १००% |
| ११. | उपयोजित कला द्वितीय वर्ष | २८ | १००% |
| १२. | उपयोजित कला तृतीय वर्ष | ३१ | १००% |
| १३. | उपयोजित कला अंतिम वर्ष | २९ | ८६.२१% |
| १४. | उपयोजित कला एम.एफ.ए. द्वितीय वर्ष | २ | १००% |
| १५. | कला शिक्षक प्रशिक्षण पदविका अभ्यासक्रम प्रथम वर्ष | २० | ९५% |
| १६. | कला शिक्षक प्रशिक्षण पदविका अभ्यासक्रम द्वितीय वर्ष | १३ | ९२% |

## Staff Achievements

- Mrs. Ashwini Salodkar - Ghule (Cont. Lecturer, Applied Art) : Ajanta JSSN-२२७७-५७३०. In Recognition the publication of the paper titled **-कला व प्रसार माध्यम** UGC Refered Journal No. ४०७७६-Ajanla ISSN २२७७-५७३०. With Impact Factor - ६.३९९. ४ days course of Online Business Marketing **Setup.** दैनिक भास्कर द्वारा आयोजित पेंटिंग स्पर्धेमध्ये 'मेरी माँ' या पेंटिंगला विशेष पुरस्कार प्राप्त झाला.
- कला संचानालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय कला महाविद्यालयातील अध्यापकांच्या कलाकृतींचे प्रदर्शन व कार्यशाळा-२०२२, सहभागी अध्यापक प्रा.र.सु. वडजे (अधिष्ठाता) , श्री.वि.म.सुरळकर (उपयोजित कला विभाग), डॉ. अंबादास जाधव (रेखा व रंगकाला), श्री.ना.पुं,सोनवणे (कला शिक्षण पदविका)
- कला संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई आयोजित राज्य कला प्रदर्शन कलाकार विभाग २०२२ डॉ. अंबादास जाधव यांच्या कलाकृतीची निवड झाली.

# Placement Details of Graduate Students (2022)

## Department of Textile Design

*Piyush Bari

Year २०२२

Company – Priyadarshini weaves pvt Ltd, Hojiwala Industries, surat.

Location – Surat, Gujrat.

Position – Jacquard Designer.

*Nikhil Joshi

Year – From March २०२३

Company – Octopix Studio

Location – Chandigarh, Haryana

Position – Illustrator

*Arish Anjum

Year – २०२२ – २०२३

Company – Shive Textile

Location – Surat

Position – Jacquard Designing

Year – Present

Company – REID & TAYLOR

Location – Jhagadiya (Bharuch)

Position – Executive Designer (Jacquard Shirting)

*Vaidehi Bhedurkar

YEAR –२०२२-२०२३

COMPANY –ONE CENTRA PVT.LTD.PUNE (ONLY CARPET, RUGS AND TILES DESIGN)

LOCATION-PUNE

POSITION –TEXTILE DESIGNER

*Rajat Kawarase

Year २०२२-२०२३

Company-  KP international

Location- Thane

Position- Senior digital textile designer

*Harshal Ahire

Year २०२२-२०२३

Company-  G.M.M Impex Pvt. LTD

Location- Boisar (Palghar)

Position- Junior Editor

Students pursuing higher education in textile

*Adarsh Upadhay : Vishwambharati University, Shantiniketan, West Bengal

*Suchita Mulgir - Vishwambharati University, Shantiniketan, West Bengal

**Department of Applied Art**

*Aditya R.Patil

२०२२-present

Position-Jr. Concept Artist

Company-Phantom FX

*Saurabh Zegekar

२०२२-present

Position-२D Game artist

Company- CultTales Interactive pvt.ltd

Location- Mumbai

*Aishwarya Bochare

२०२२-present

Position- UX/UI designer

Company- Creative Concept

Location-Pune

* Mayuresh Tithe

२०२२-present

Position- Graphic Designer

Company- Holding Corporation

Location- Pune

* Mrunendra Jengthe

२०२२-present

Position- Graphic Designer

Company- Akar Films and Digital

Location- Mumbai.

* Mrunendra Jengthe

२०२२-present

Position- Graphic Designer

Company- Akar Films and Digital

Location- Mumbai.

* Lalit Bonde

२०२१-present

Position- Senior Visualizer

Company - Elixir Integrated Brandcomm

Location- Mumbai.

* Vaishnavi Mankar

२०२१-present

Position- Visualizer

Company - JP Morgan Chase & Co.

Location - Mumbai

* Sumit Kherde

२०२२-present

Position- २D Illustrator

Company- Individual Learning Limited (Embibe)

Location- Bengaluru

सुमित खेरडे याने राष्ट्रीय पातळीची अध्यापकांसाठीची पात्रता परीक्षा UGC NET § २०२१ उत्तीर्ण केली आहे.

* Lalitkumar Adhau

२०२२-present

Position- २D Illustrator

Company- Individual Learning Limited (Embibe)

Location- Bengaluru

* Kunal Thakare

२०२२-present

Position- Asst. Prof. (Photography)

Company- Vasantdada Patil College of Engineering and Visual Arts

Location- Mumbai.

* Rutuja Kulkarni

२०२२-present

Position- Photographer

Company- Firstcry.com

Location- Pune

* Vishal Shahane

२०२१-present

Position- Graphic Designer

Company- MGM, Aurangabad

# ७५ व्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त चित्र प्रदर्शन

दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ रोजी ७५ व्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांचे चित्र प्रदर्शन आयोजित करण्यात आले. प्रदर्शनाचे उदघाटन प्र.अधिष्ठाता वि.म.सुरळकर यांच्या हस्ते करण्यात आले.






# एकदिवसीय वर्षा सहल २०२२-२३

दिनांक १४/१०/२०२२ रोजी महाविद्यालयाची एकदिवसीय वर्षासहल गौताळा अभयारण्य येथे गेली व सदर सहली दरम्यान विद्यार्थ्यांनी निसर्गाचा आनंद घेत निसर्गचित्रण,रेखांकन व छायाचित्रण केले.







# केंद्रीय युवक महोत्सव २०२२-२३

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे केंद्रीय युवक महोत्सव २०२२-२३ दिनांक १६ आक्टेंबर ते १९ आक्टोंबर २०२२ या कालावधी मध्ये संपन्न झाला असून सदर महोत्सवामध्ये या महाविद्यालयातील एकूण अकरा विद्यार्थ्यांनी आठ कला प्रकारांमध्ये सहभाग नोंदविला होता व खालील प्रमाणे पुरस्कार प्राप्त केले आहेत.

| **कला प्रकाराचे नाव** | **विद्यार्थ्यांचे नाव** | **वर्गाचे नाव** | **पारितोषिक** |
|---|---|---|---|
| मृदूमुर्तीकला | श्री.पवन गावंडे | तृतीय वर्ष वस्त्रकला | प्रथम पारितोषिक |
| रांगोळी | श्री.वेदांत वनशिंगे | अंतिम वर्ष उपयोजित कला | प्रथम पारितोषिक |
| कोलाज | श्री.विशाल घुगे | तृतीय वर्ष उपयोजित कला | द्वितीय पारितोषिक |
| चित्रकला | श्री.यश पाटसकर | तृतीय वर्ष रेखा व रंगकला | द्वितीय पारितोषिक |
| व्यंगचित्र | श्री.विशाल धुमाळ | तृतीय वर्ष उपयोजित कला | द्वितीय पारितोषिक |
| पोस्टर | कु.दिपाली तायडे | तृतीय वर्ष उपयोजित कला | तृतीय पारितोषिक |
| स्पॉट फोटोग्राफी | श्री.राहूल हरणे | तृतीय वर्ष उपयोजित कला | तृतीय पारितोषिक |
| लघुपट | श्री.हर्षल पवार,<br>श्री.प्रतिक लाडे,<br>श्री.अनिकेत देवगिरीकर,<br>श्री.कौशल पराळे | उपयोजित कला विभाग | तृतीय पारितोषिक |







केंद्रीय युवक महोत्त्सव २०२२-२३ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे डॉ. अंबादास जाधव व श्रीमती.अश्वीनी रमेश सालोडकर यांनी महाविद्यालयाचे संघ व्यवस्थापक म्हणून काम पहिले.

## वेस्ट झोन : युवक महोत्सव (गणपत युनिर्व्हसिटी, गुजरात)

१. श्री.विशाल घुगे

२. श्री.वेदांत वनशिंगे

३. श्री.राहूल हरणे

४. श्री.ऋषिकेश मुऱ्हेकर

५. श्री.विशाल धुमाळ

हे विद्यार्थी सहभागी झाले होते.



१९ नोव्हेंबर, २०२२ विद्यापीठ परिसरामध्ये श्री.निलेश ठोकळे यांनी छायाचित्रणावरती

तृतीय वर्ष, उपयोजित कला विभागाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# राज्यस्तरीय इंद्रधनुष्य : युवक महोत्सव २०२२-२३

| कलाप्रकाराचेनाव | विद्यार्थ्यांचेनाव | वर्गाचेनाव | पारितोषिक |
|---|---|---|---|
| इन्स्टॉलेशन | श्री.विशाल घुगे<br>श्री.विशाल धुमाळ<br>श्री.वेदांत वनशिंगे<br>श्री.सौरभ श्रीभाते | उपयोजित कला विभाग | प्रथम पारितोषिक |
| मृदूमुर्तीकला | श्री.ऋषिकेश मुऱ्हेकर | उपयोजित कला विभाग | द्वितीय पारितोषिक |





# Career opportunities in Animation industry एकदिवसीय कार्यशाळा

दि. १६/११/२०२२ रोजी शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद येथे Career opportunities in Animation industry या विषयावर उपयोजित कला विभागातील (तृतीयवर्ष) विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. प्रा.निलेश उदमले यांनी आपल्या प्रेझेंटेशन मध्ये अनिमेशन सॉफ्टवेअर, अनिमेशनचे प्रकार, इतिहास, इंडस्ट्री बद्दल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यानी उत्सूर्फपणे कार्यशाळेस सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष अधिष्ठाता प्रा.रमेश सुभाष वडजे यांनी प्रा.निलेश उदमले यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा.अश्विनकुमार जोगदंड यांनी सहकार्य केले.





# ऋषिराज गवळी वर्कशॉप







महाविद्यालयात दि. रोजी ऋषिराज गवळी यांची Illustration या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

# 'महिलांचे स्वच्छता व आरोग्य' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान

महाविद्यालयात दि:२८/११/२०२२ रोजी अंतर्गत समितीने सर्व विद्यार्थिनींसाठी, समितीची माहिती तसेच “महिलांचे स्वच्छता व आरोग्य” या विषयावर, समितीच्या NGO सदस्या माननीय श्रीमती. डॉ.रश्मी बोरीकर यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.





# अध्यापकांच्या कलाकृतीचे प्रदर्शन व विद्यार्थ्यांची कार्यशाळा

दि. १ डिसेंबर,२०२२ रोजी कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या अधिपत्याखालील मुंबई,नागपूर,औरंगाबाद शासकीय कला महाविद्यालयातील अध्यापकांच्या कलाकृतीचे प्रदर्शन व शासकीय कला महाविद्यालयातील व विद्यार्थ्यांची कार्यशाळा. या दरम्यान आयोजित करण्यात आली.या प्रदर्शनाचे उदघाटन तत्कालीन मा. प्र.कला संचालक, डॉ.साबळे यांच्या हस्ते झाले.तसेच सदरील कार्यशाळेस मुंबई,नागपूर व औरंगाबाद येथील रेखा व रंगकला विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला कार्यशाळेस डॉ.गणेश तारतरे यांनी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.












महाविद्यालयाने वेरूळ येथील लेणी परिसरात मा.राजेंद्र महाजन -प्राचार्य ,ललित कला केंद्र,चोपडा,जिल्हा-जळगाव यांचे दिनांक ३० नोव्हेंबर, २०२२ रोजी “अजिंठा व वेरुळ लेणी” या विषयावर व्याख्यान आयोजित केले. प्रस्तुत व्याख्यानाचा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.



कला संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय कला महाविद्यालयातील अध्यापकांच्या कलाकृतींचे प्रदर्शन व कार्यशाळा २०२२ सहभागी अध्यापक प्रा. र. सु. वडजे (अधिष्ठाता), श्री. वि. म .सुरळकर (उपयोजित कला विभाग), डॉ. अंबादास जाधव (रेखा व रंगकाला विभाग), श्री. ना.पु . सोनवणे (कला शिक्षा पदविका विभाग)






कला संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय कला महाविद्यालयातील अध्यापकांच्या कलाकृतींचे प्रदर्शन व कार्यशाळा २०२२ सहभागी अध्यापक प्रा. र. सु. वडजे (अधिष्ठाता), श्री. वि. म .सुरळकर (उपयोजित कला विभाग), डॉ. अंबादास जाधव (रेखा व रंगकाला विभाग), श्री. ना.पु . सोनवणे (कला शिक्षा पदविका विभाग)



दिनांक ०३ डिसेंबर २०२२, रोजी श्री क्रिएशन, काल्डा कॉर्नर या ठिकाणी तृतीय वर्ष उपयोजित कला विद्यार्थ्यांची प्रिंटिंग टेक्नॉलॉजि या संदर्भात आऊट डोअर व्हिजिट.





दिनांक १० डिसेंबर २०२२, रोजी महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष उपयोजित कला विभागाच्या विद्यार्थ्यांनी प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड , एम.आय.डी.सी. चिकलठाणा, औरंगाबाद या कंपनीला भेट दिली व विविध प्रिंटिंग मशीन आणि प्रिंट मीडिया बाबत माहिती जाणून घेतली प्रसंगी श्री. श्याम तापसकर यांनी मार्गदर्शन केले.




Pre-Press

# कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई आयोजित राज्य कलाप्रदर्शन २०२२ मध्ये पुरस्कृत विद्यार्थी



पत्रकार रोशन छत्रपति (द्वितीय वर्ष,वस्त्रकला विभाग)- प्रथम पुरस्कार



जैन प्रतीक्षा विनोद (द्वितीय वर्ष,वस्त्रकला विभाग)- गुणवत्ता पुरस्कार

# क्रीड़ा सप्ताह २०२२



महाविद्यालयात दि: २२ - २९ डिसेंबर,२०२२ या दरम्यान क्रीडा सप्ताहाचें आयोजन करण्यात आले.महाविद्यलयातील विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारातून मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.



महाविद्यालयाच्या  कलादालनात दिनांक ०४/०१/२०२३ ते १३/०१/२०२३ रोजी श्रीमती शिल्पा अनंत निकम यांच्या कलाकृतींचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. प्रस्तुत प्रदर्शनास अनेक कलारसिकांनी व विद्यार्थ्यांनी भेट दिली.



# अवयवदान व रक्तदान या विषयांवर जगृतीपर व्याख्यान

दिनांक १७ फेब्रुवारी २०२३ रोजी शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालयामध्ये सर्व अध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी यांच्यासाठी अवयवदान व रक्तदान या विषयांवर एक जगृतीपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून डॉ.श्री.सुधिर कुलकर्णी (Head of Nephrology Department ,MGM व Chairman of Organ donation Committee) यांनी अवयवदान या संदर्भात असलेले समज- गैरसमज तसेच त्यासाठी असणारे निकष,कायदेशीर बाबी व त्याची समाजामध्ये असणारी गरज व महत्व याविषयावर मार्गदर्शन केले व डॉ.श्री प्रकाश पाटणी (Head of Lions blood bank) यांनी रक्तदानाविषयी प्रबोधन केले.







# हस्तशिल्प प्रात्यक्षिक कार्यक्रम

विकास आयुक्त कार्यालय (हस्तशिल्प) भारत सरकार, वस्त्रमंत्रालय व हस्तशिल्प सेवा केंद्र औरंगाबाद यांचे संयुक्त विद्यमाने शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद येथे हस्तशिल्प प्रात्यक्षिक कार्यक्रम (Craft Demonstration Program) दिनांक १४/०२/२०२३ रोजी दुपारी १२.०० वा. प्रा.रमेश सुभाष वडजे, अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद यांचे हस्ते उद्घाटन झाले. सदर कार्यक्रमास श्री. गणेश्वर अंबेकर, उपायुक्त, मानव संसाधन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, श्री.विनोद कुलकर्णी, उपायुक्त, मानव संसाधन आयुक्तालय, महाराष्ट राज्य, नॅशनल अवार्ड प्राप्त श्री.छोटू जडे, पारोळा, जि.जळगांव, श्री.अमनकुमार जैन, सहायक निदेशक, हस्तशिल्प सेवा केंद्र,औरंगाबाद तसेच महाविद्यालयातील अधिकारी,सर्व अध्यापक ,विद्यार्थी, व कर्मचारी उपस्थित होते.






# अध्यापक डॉ. अंबादास नारायण जाधव यांच्या कलाकृतींचे प्रदर्शन

शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद येथील कलादालनात कं.अधिव्याख्याता डॉ.अंबादास नारायण जाधव यांच्या चित्रप्रदर्शनाचे दिनांक २१ फेब्रुवारी, २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता ॲड. अरविंद अंबेटकर, उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद व प्रा. रमेश सुभाष वडजे, अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद यांचे हस्ते उद्घाटन झाले.






# जागतिक महिला दिना निमित्त कार्यक्रम

दिनांक ०८ मार्च, २०२३ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त महाविद्यालयात अंतर्गत समितीने महिला कर्मचारी व विद्यार्थीनींसाठी एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास विद्यार्थिनी व समितीचे सदस्य उपस्थित होते. विद्यर्थिनींसाठी एक आगळा उपक्रम म्हणून या वेळेस एक प्रहसनाची स्पर्धा ठेवण्यात अली.






## वार्षिक कला प्रदर्शन व स्नेहसंमेलन

महाविद्यालयाच्या सर्व विभागातील विद्यार्थ्यांच्या वार्षिक वर्गकामातील निवडक कलाकृतींचे प्रदर्शन व स्नेहसंमेलनाचे उद्धटन दिनांक: २८/०३/२०२३ रोजी प्रमुख पाहुणे मा.श्री रुपचंद मधुकर वाघमारे (पोलीस उप-अधीक्षक,औरंगाबाद ) यांच्या हस्ते झाले.दिनांक :२८ ते ३१ मार्च, २०२३ या कालावधीत प्रदर्शन व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.प्रस्तुत प्रदर्शनास शहरातील कलारसिकांनी मोठ्या संख्येने भेट दिली व विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे कौतुक केले.





# पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांची यादी

**उपयोजित कला विभाग**

**शासकीय रोख पारितोषिक**

प्रथम पारितोषिक रु. ५०० श्री भागवत गुलाबराव शेळके अंतिम वर्ष

द्वितीय पारितोषिक रु. ३०० श्री प्रतीक देवाजी लाड

तृतीय पारितोषिक रु. २०० कु. रागिणी अजय इंगळे तृतीय वर्ष

**गुणवत्ता प्रमाणपत्र**

प्रथम वर्ष- ०५  द्वितीय वर्ष- ०५  तृतीय वर्ष- ०५  अंतिम वर्ष -०५

**प्रथम वर्ष उपायोजित कला**

कु. प्रणाली पटले - प्रेस लेआऊट

श्री. पीरसु वंजारी - २डी

श्री. प्रशांत पिंगळे - हेडस्टडी

श्री. जीवन छानवाल - २डी

**द्वितीय वर्ष उपयोजित कला**

श्री. सुजीत देवरे प्रेस - लेआऊट

श्री. प्रदीप चौधरी - प्रेस लेआउट

कु. आकांक्षा शेंडे - टायपोग्राफी

कु. अंजली बेलेकर - लाइफ ड्रॉइंग

श्री. निशांत चौधरी - स्टेशनरी डिजाइन

**तृतीय वर्ष उपयोजित कला**

कु. शृंगानीं निलेशराव देवतळे

कु. श्वेता राजू चिप्पावार

कु. अवंतिका अभय केणे

श्री. राजीव आनंद कुलकर्णी

कु. निर्मिती दिनेश सैंदाणे

**अंतिम वर्ष उपयोजित कला**

श्री. वेदांत वनसिंग

कु. स्नेहा बबनराव भोसले

कु. अंकिता सुहास जगताप

श्री. अनिकेत सतीश देवगिरीकर

कु. प्रगती सुभाष होळ

**प्रायोजित**

श्री. भागवत गुलाबराव शेळके – वाह्यत ग्रुप तर्फे रु. ३००० रोख बक्षीस फायनल इअर

श्री. आदित्य प्रशांत खामकर – जिंगल ट्यून्स तर्फे रु. ५०० रोख बक्षीस अंतिम वर्ष

श्री. कौस्तूभ मनीष अहिरराव – जिंगल ट्यून्स तर्फे रु. ५०० रोख बक्षीस तृतीय वर्ष

श्री. तुषार सतीश जाधव – जिंगल ट्यून्स तर्फे रु. ५०० रोख बक्षीस तृतीय वर्ष

श्री. ओम मीनल रॉय – जिंगल ट्यून्स तर्फे रु. ५०० रोख बक्षीस तृतीय वर्ष

कु. कल्याणी काकडे – रमेश सालोडकर स्मृती पुरस्कार प्रायोजित अ .र . सालोडकर रु. १००१ रोख द्वितीय वर्ष

**बॅडमिंटन**

**पुरुष एकेरी बॅडमिंटन**

विजेता - रमेश जावीर टेक्स्टाइल फायनल इयर

उपविजेता - योगेश जगताप टेक्स्टाइल फायनल इयर

पुरुष दुहेरी बॅडमिंटन

विजेता - योगेश जगताप , रमेश जावीर टेक्स्टाइल फायनल इयर

उपविजेता - नकुल जाधव , विशाल गायकवाड ए टी डी

**मिश्र बॅडमिंटन**

विजेता - योगेश जगताप , अनुजा बांगड टेक्स्टाईल फायनल इयर

उपविजेता - विराज मालपेकर अप्लाइड फायनल इयर , ईश्वरी गिरमे टेक्स्टाइल थर्ड इअर

**महिला एकेरी बॅडमिंटन**

विजेता - अंजली मनगटे टेक्स्टाईल थर्ड इअर

उपविजेता - विशाखा निवटकर अप्लाइड सेकंड इअर

**महिला दुहेरी बॅडमिंटन**

विजेता - अंजली मनगटे , पूजा राजगुरु टेक्स्टाईल थर्ड इअर

उपविजेता - समिधा परांजपे उपयोजित कला तृतीय वर्ष, अवंतिका केणे उपयोजित कला तृतीय वर्ष

**टेबल टेनिस**

**महिला एकेरी**

विजेता - अनुजा बांगड टेक्स्टाइल फायनल इयर

**महिला दुहेरी टेबल टेनिस**

विजेता - अनुजा बांगड टेक्स्टाइल फायनल इयर

उपविजेता - वैष्णवी वैद्य वस्त्रकला , हिना झाडेकर रेखा व रंगकला

**मिश्र टेबिल टेनिस**

विजेता - योगेश जगताप , अनुजा बांगड टेक्स्टाइल फायनल इयर

उपविजेता - संदीप खैरनार अप्लाइड फायनल इयर , ज्ञानेश्वरी घुले टेक्स्टाइल थर्ड इअर

**क्रिकेट महिला**

विजेता - टेक्स्टाईल काइट रनर टीम

उपविजेता - अप्लाइड

**क्रिकेट पुरुष**

विजेता - टेक्स्टाईल काइट रनर टीम

उपविजेता - अप्लाइड फायनल इअर

**हॉलीबॉल महिला**

विजेता - अप्लाइड

उपविजेता - टेक्स्टाईल काइट रनर टीम

**हॉलीबॉल महिला**

विजेता - टेक्स्टाईल काइट रनर टीम

उपविजेता - अप्लाइड फायनल इयर

**पुरस्कारांची यादी**

**क्रीडा सप्ताह विजेते उपविजेते**

**कॅरम एकेरी**

विजेता - ओम मोरे ए टी डी

उपविजेता - विराज मालपेकर अप्लाइड फायनल इयर

**दुहेरी कॅरम**

विजेता - वैष्णवी वैद्य , प्रतीक्षा काटकर - टेक्स्टाईल

उपविजेता - अनिकेत घोडगेकर , विशाल घुगे - अप्लाइड थर्ड इअर

**मिश्र दुहेरी कॅरम**

विजेता - वैष्णवी वैद्य , रमेश जावीर टेक्स्टाईल फायनल इअर

उपविजेता - विराज मालपेकर , पूजा राजगुरु टेक्स्टाईल थर्ड इअर

**बुद्धिबळ**

विजेता - अनुराग शेंडे - अप्लाइड फर्स्ट इअर

उपविजेता - नचिकेत पाटील - ए टी डी

**टेबल टेनिस**

**एकेरी पुरुष**

विजेता - विपुल पाटील रेखा व रंगकला

उपविजेता - हर्षवर्धन शिंदे अप्लाइड सेकंड

**पुरुष दुहेरी टेबल टेनिस**

विजेता - योगेश जगताप - टेक्स्टाईल फायनल इअर , संदीप खैरनार - अप्लाइड फायनल इयर

उपविजेता - अंकुश चौधरी - पेंटिंग फायनल इयर , कृष्णमंडल - पेंटिंग थर्ड ईयर

पुरस्कार

- कै . रमेश सालोडकर यांच्या स्मरणार्थ सौ अश्विनी सालोडकर यांच्या मार्फत रु.१००१ पारितोषिक.
- वाहयात ग्रुप यांच्या तर्फे बेस्ट वर्क पुरस्कार रु.३०००
- जिंगल स्टुल ॲनिमेशन स्टुडीओ संभाजीनगर
- डायरेक्टर श्री संदिप पाठक सर यांच्या तर्फे रु. ५००० व एकूण ९ ट्रॉफी व प्रमाणपत्र
- प्रिंट मेकिंग स्टुडीओ अवार्ड बाय प्रो.अनंत निकम

प्रथम वर्ष पेंन्टींग § रु. ५००

द्वितीय वर्ष पेंन्टींग § रु.१०००

तृतीय वर्ष पेंन्टींग § रु.१०००

चतुर्थ वर्ष पेंन्टींग - रु.१०००

- बेस्ट स्टुडन्ट अवार्ड अंतीम वर्ष पेन्टींग प्रा. अनंत निकम व प्रा. विवेक लाड यांच्या तर्फे रुपये ३००० .
- प्रा. राजमहमद पठाण, आर्ट हब फर्म यांच्या तर्फे बेस्ट स्टुडन्ट § १००० .
- प्रा. विवेक लाड यांच्या तर्फे बेस्ट पेंन्टींग कंम्पोझिशन इन एक्झीबीशन - १०००
- प्रा. र. सू. वडजे यांच्यातर्फे गुरुवर्य म भा इंगळे पुरस्कार

- रु. ५०० तीन तृतीय वर्ष उपयोजित कला

- रु. ५०० एक अंतिम वर्ष वस्त्रकला

- रु. ५०० चा एक ए टी डी द्वितीय वर्ष

- रु. ५०० चा दोन रेखा व रंगकला

**रेखा व रंगकला विभाग**

**शासकीय रोख पारितोषिक**

प्रथम पारितोषिक रुपये ५००/ श्री. रेमता पावरा

द्वितीय पारितोषिक रुपये ३००/ श्री. नरेश आठवले

तृतीय पारितोषिक रुपये - २००/ श्री. यश पाटसकर

गुणवत्ता प्रमाणपत्र प्रथम वर्ष ०३, द्वितीय वर्ष ०३, तृतीय वर्ष ०३, अंतिम वर्ष ०४

**प्रथम वर्ष रेखा व रंगकला**

१. कु. पल्लवी नारायणकर

२. श्री. दर्शन गोरे

३. कु. वैष्णवी जाधव

४. श्री. आकाश वाघ

**द्वितीय वर्ष रेखा व रंगकला**

1. श्री. निसर्ग गणकवार
2. कु. युग श्री मांडवकर
3. श्री. पप्पु शहा
4. कु. संघमित्रा डोळस

**तृतीय वर्ष रेखा व रंगकला**

1. कु. खुशाली डोमने
2. कु. हिना झाडेकर
3. श्री. ईश्वर पवार
4. कु. ऐमन पटेल

**अंतिम वर्ष रेखा व रंगकला**

१. श्री. संदिप वाघ
२. कु. श्वेता भुसेकर

३. कु. किरण प्रधान

४. कु. मयुरी बुरघाटे

**प्रायोजित :**

1. प्रा. अनंत निकम व प्रा. विवेक लाड यांचे तर्फे बेस्ट स्टुडन्ट अवार्ड रोख रक्कम रु. ३०००/- श्री. अजिंक्य श्रीवास्तव , अंतिम वर्ष आबासाहेब रेखा व रंगकला
2. प्रा. विवेक लाड यांचे तर्फे बेस्ट कम्पोझिशन रोख रक्कम रु. १०००/- ईश्वरं पवार तृतीय वर्ष रेखा व रंगकला
3. प्रा. राजमोहम्मद पठाण यांचे तर्फे बेस्ट कम्पोझिशन आर्ट हब अवार्ड रोख रक्कम रु.१०००/- कृष्णा मंडल तृतीय वर्ष रेखा व रंगकला
4. प्रा. अनंत निकम यांचेतर्फे प्रिंन्ट स्टुडिओ अवार्ड रोख रक्कम रु. १०००/- श्री. पप्पु शहा, द्वितीय वर्ष रेखा व रंगकला
5. प्रा. अनंत निकम यांचेतर्फे प्रिंन्ट स्टुडिओ अवार्ड रोख रक्कम रु.१०००/- रेमता पावरा, अंतिम वर्ष रेखा व रंगकला
6. प्रा. अनंत निकम यांचेतर्फे प्रिंन्ट मेकिंग स्टुडिओ अवार्ड रोख रक्कम रु. १०००/- कु. अंशिका यादव, तृतीय वर्ष रेखा व रंगकला
7. प्रा. अनंत निकम यांचेतर्फे प्रिंन्ट स्टुडिओ अवार्ड रोख रक्कम रु.५०००/- श्री अविनाश जाधव, प्रथम वर्ष रेखा व रंगकला
8. प्रा. रमेश वडजे, यांच्या तर्फे गुरुवर्य म.भा. इंगळे पुरस्कार रोख रक्कम रु. ५००/- श्री विपुल पाटील, तृतीय वर्ष
9. जिंगल टूण तर्फे ट्राफी, प्रमाणपत्र व रोख रक्कम रु.५००/- कु. अंकिता विसपुते, द्वितीय वर्ष
10. जिंगल टूण तर्फे ट्राफी, प्रमाणपत्र व रोख रक्कम रु.५००/- कु. नरेश आठवले, अंतिम वर्ष
11. बाह्यात ग्रुप २००९-२०13 रोख रु.१००/- कॅश पुरस्कार - विपूल मनोज पाटील

**वस्त्रकला विभाग**

प्रथम पारितोषिक रु. ५००/- प्रियंका कोतकर अंतिम वर्ष

द्वितीय पारितोषिक रु. ३००/- प्रतीक्षा कामत तृतीय वर्ष

तृतीय पारितोषिक रु. २००/- वैष्णवी वैद्य अंतिम वर्ष

गुणवत्ता प्रमाणपत्र प्रथम वर्ष द्वितीय वर्ष तृतीय वर्ष अंतिम वर्ष प्रत्येकी ०३

**प्रथम वर्ष टेक्स्टाइल डिझाइन**

१. आकाश बडोले
२. पारस घोडे
३. श्रीया घोंगडे

**द्वितीय वर्ष टेक्स्टाइल डिझाइन**

१. गुंजन गिरडकर
२. रोशन पत्रकार
३. मिश्री बक्षी

**तृतीय वर्ष टेक्स्टाइल डिझाइन**

१. ज्ञानेश्वर घुले
२. पवन गावंडे
३. ईश्वरी गिरमे

**अंतिम वर्ष टेक्स्टाइल डिझाइन**

१. कोमल जोशी
२. ईश्वरी महाजन
३. अनुजा बांगर

**प्रायोजित : (वाह्यात ग्रुप )**

शंकर बेथेकर तृतीय वर्ष

गणेश बुरांडे द्वितीय वर्ष

**कला शिक्षक प्रशिक्षण विभाग**

**शासकीय रोख पारितोषिक**

प्रथम पारितोषिक रुपये ५००/- नचिकेत भगवान पाटील

द्वितीय पारितोषिक रुपये ३००/- नितिन विष्णु जाधव

तृतीय पारितोषिक रुपये २००/- शितल एकनाथ सोनवणे

**गुणवत्ता प्रमाणपत्र :**

प्रथम वर्ष ०३, द्वितीय वर्ष ०३

**प्रथम वर्ष कला शिक्षक प्रशिक्षण (गुणवत्ता)**

१. खुशाल पांडुरंग वानखेडे
२. ओमप्रकाश संजय मोरे
३. अंजली नारायण नलावडे
४. विशाल भाष्कर गायकवाड

**द्वितीय वर्ष कला शिक्षक प्रशिक्षण (गुणवत्ता)**

1. पुजा सनीराम मधे
2. अनुष्का नरसिंग राजपूत
3. नेस संजय पाटणी

**प्रायोजित :**

१. आरती राजेंद्र साठे - वाहयात प्रुम- माजी विद्यार्थी २००९-२०१३ रोख रु. १००
२. नचिकेत भगवान पाटील - गुरुवर्य म. भा. इंगळे पुरस्कार प्रा. र. सू. वडजे यांचेकडून रोख रु. ५००
३. सिमरन फकिरा तडवी - जिंगल ट्यून्स अभिमेशन टॅलेट अप्रिसिएशन रोख रु. ५००
४. संध्या दिलीप जाभव प्रमाणपत्र - जिंगल ट्यून्स अभिमेशन टॅलेट अप्रिसिएशन रोख रु. ५००

# महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण ठरविण्या संदर्भात समिती भेट

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण ठरविण्या संदर्भात शासनाने एक समिती स्थापन केली असून त्यातील दृश्यकला विषयाचे प्रमुख श्री. सुहास बहुलकर आहेत. त्यांच्यासोबत या समितीत प्रा. जी.एस.माजगावकर-कोल्हापूर,डॉ.श्रीकांत प्रधान-पुणे, चंद्रकांत चन्ने-नागपूर व उपयोजित कला विषयाचे तज्ञ चित्रकार सुनील महाडिक-मुंबई यांचा समावेश आहे.त्याचप्रमाणे प्राध्यापक डॉ.गणेशतरतरे हे महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधित्व करत आहेत.




यासंदर्भात छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे दि.२४ एप्रिल २०२३ सोमवार, वेळ ११:३० वाजता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, किल्लेअर्क, येथेउपरोक्त विषया संदर्भात विचारसभा आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुत विचार सभेत अधिष्ठाता, अध्यापक, शहरातील नामवंत कलावंत, माजी विध्यार्थी, सेवानिवृत्त अध्यापक इ. उपस्थित होते.

उपस्थितीत होते.





या सभेस संस्थेचे आजी-माजी विद्यार्थी कलाअध्यापक व संस्थेचेप्रमुख अधिष्ठाता उपस्थितीत होते.

# विद्यापीठ हिस्ट्री म्यूजियम भेट



०३ मे, २०२३ रोजी विद्यापीठातील हिस्ट्री म्यूजियम ला एम.एफ.ए उपयोजित कला वर्गाने अभ्यास भेट दिली.

# इतर उपक्रम

शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद या महाविद्यालयामध्ये ७५ वा आजादी का अमृत महोत्सवानिमीत्त विविध विषयांवर चर्चासत्र व इतर कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

१. देशभक्तीगीत स्पर्धा

२. स्वातंत्र्यानंतरची भारताची प्रगती (परिसंवाद)

३. डिजीटल इंडीयाचे फायदे (कार्यशाळा)

४. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमीत्त स्वच्छता अभियान

५. वाढते जागतिक तापमान आणि आपली जबाबदारी (चर्चासत्र)

६. घटनात्मक लोकशाही (चर्चासत्र व प्रशनोत्तरे)

७. महाराष्ट्राची शिक्षणक्षेत्रातील प्रगती (परिसंवाद)

८. शिक्षणाचे महत्व (व्याख्यान)

९. स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवानिमीत्त वृक्षारोपण

१०. शाश्वत विकासाचे ध्येय (वेबिनार)

११. अनाम स्वातंत्रसैनिकांच्या स्मृतीला उजाळा

१२. वेध-भविष्यातील शिक्षणपध्दतीचा (चर्चासत्र)

१३. भारताच्या स्वातंत्र्याचा शतकमहोत्सव आणि महाविद्यालयाची ध्येयधोरणे (चर्चासत्र)

# ७५ वा आजादी का अमृत महोत्सवानिमीत्त चर्चासत्र

शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद या महाविद्यालयामध्ये ७५ वा आजादी का अमृत महोत्सवा निमीत्त दिनांक २७/५/२०२२ रोजी Resolve@ ७५या इव्हेंट मध्ये Rising global temperatures and your responsibility seminar (वाढते जागतिक तापमान आणि आपली जबाबदारी-चर्चासत्र) आयोजित करण्यात आले होते.







महाराष्ट्र शासन
शासकीय कला व अभिकल्प
औरंगाबाद
स्वातंत्र्या नंतरची
(परिसंवाद)


शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय
अनाम स्वातंत्र्य सैनिकांच्या
स्मृती उजाळा


महाराष्ट्र शासन
शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय
औरंगाबाद
महाराष्ट्राची शिक्षण क्षेत्रातील प्रगती
(परिसंवाद)

दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे विद्यापीठ वर्धापन दिनानिमीत्त महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु.अश्विनी प्रकाश मरकड ला मार्च / एप्रिल २०२१ मध्ये बी.एफ.ए. रेखा व रंगकला पदवी अभ्यासक्रमामध्ये सर्वात जास्त मार्क मिळाल्याबद्दल श्री.अनिल उत्तमराव गजहंस पारितोषिक रोख रु.१०००/- विद्यापीठामार्फत देऊन गौरविण्यात आले.

कला शिक्षक पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी रचना चित्र या विषयावर दिनांक ०७/१०/२०२२ रोजी प्रा.गणेश तरतरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

महाविद्यालयाने कला शिक्षक पदविका वर्गासाठी प्राचीन भारतीय कला व संस्कृतीचा अभ्यास या विषयांतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभाग व सोनेरी महल पुराण वस्तू संग्रहालय येथे भेट दिली. भेटी दरम्यान डॉ. अनिल गोटे - सहायक अधीक्षक, राज्यापुरातत्व विभाग व सोनेरी महाल - श्री. मयुरेश खडके यांनी मार्गदर्शन केले. इतिहास वस्तू संग्रहालय येथे डॉ. अमोल कुलकर्णी आणि प्रा. कुमार भवर यांनी अमूल्य मार्गदर्शन केले.

शैक्षणिक अभ्यास दौऱ्यांमध्ये पदविका अभ्यासक्रमाचे विद्यार्थी वर्ग शिक्षकांसह इतिहास व प्राचिन भारतीय कला संस्कृतीचा अभ्यास या विषयावर दिनांक २१ आक्टोंबर २०२२ रोजी सहायक संचालक, पुरातत्व विभाग, महाराष्ट्र शासन, सोनेरी महल, औरंगाबाद व इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे शैक्षणिक अभ्यासासाठी भेट दिली. नॅशनल आर्ट कॅम्प एक्झिबिशन : अजंता २०२२ चे आयोजन कॅमल फाऊंडेशन व सर ज.जी.कला महाविद्यालय, मुंबई यांचे संयुक्त विद्यमाने दिनांक २५/१०/२०२२ रोजी अजिंठा येथे घेण्यात आले असून सदर कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील श्री.रेमता पावरा व श्री.विशाल वाघ हे विद्यार्थी सहभागी झाले होते.

जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये कु.समिधा परांजपे यांना तायकान्दो या क्रिडा प्रकारामध्ये गोल्ड मेडल मिळविले.

भारत निवडणूक आयोग आयोजित मतदार जागृती स्पर्धा “माझे मत माझे भविष्य : एका मताचे सामर्थ्य” या विषयावर प्रश्नमंजूषा स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, गीतस्पर्धा, व्हिडीओ स्पर्धा व भित्तीचित्र या विविध स्पर्धा मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सहभाग नोंदविला.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांची सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाची मान्यता F.No.Western/१-१०९७५६९७९८६/२०२२/EOA, Dated 03 July 2022 मिळालेली असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांचे सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाची (संलग्नता) मान्यता संदर्भ क्र.:शैक्ष/संलग्न/बीएलबी/२०२२-२३/२६९९७-२७००२, दिनांक ६ एप्रिल २०२३ नुसार मिळालेली आहे.

महाराष्ट्र शासन

# शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय,

व्ही.आय.पी. रोड, किले अर्क, औरंगाबाद 431001

दुरध्वनी क्र. 0240 - 2970225 वेबसाईट - www.gcad.org.in ई-मेल आयडी - gsa. aurangabad@gmail.com